रजिस्टर/शाखा पत्र


# उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग

ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.

मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र

Head Office, Ground Floor,Ulhasangar-४२१ ००३ Dist Thane, Maharashtra

Tel No:- ९५२५१-२७२०११६ /१२५ Ext. No. २३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४


जा.क्र./उमपा/करवि/यु ३/८३/२२

दिनांक ८/१२/२०२२

**प्रस्तावना**

विषय :– उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता कर देण्यास प्रथमत:पात्र व्यक्ती म्हणुन **श्री रामचंदर रामबली जैसवार** यांचे नांवे मालमत्ता क्र. 25BO00443000 अन्वये करण्यात आलेली नांवाची नोंद रद्द करुन पुर्ववत **रामबली जे. जैस्वाल** यांचे नांवे करणेबाबत.

संदर्भ :– १) श्री. जालंधर रामबली जैस्वार यांचा दिनांक २८/१०/२०२२ रोजीचा अर्ज.

अर्जदार श्री. जालंधर रामबली जैस्वार राहणार बॅरेक नं. ७३४ समोर, शास्त्री नगर, हॉस्पीटल एरिया, उल्हासनगर –३ यांनी दिनांक २८/१०/२०२२ रोजीचा अर्ज अर्जानुसार मालमत्ता क्र. 25BO00443000 (२५/०३७९) करीता मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणुन **श्री रामचंदर रामबली जैसवार** अशी नावाची नोंदीबाबत हरकत दाखल केली आहे.

सदर आक्षेपाच्या अनुषंगाने संगणकीय नोंदीनुसार तपासणी केली असता कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र 25BO00443000 (२५/०३७९) करीता मालमत्ता कर देण्यास जबाबदार व्यक्ती म्हणुन रामबली जे. जैस्वाल रा.बॅ.नं. **७३४ समोर, शास्त्री नगर, हॉस्पीटल एरिया, उल्हासनगर–३** अशी नोंद होती.

तद्नंतर **श्री रामचंदर रामबली जैसवार** यांनी नांव हस्तांतरण करणेसाठी दि. ०५/०४/२०२२ रोजी अर्ज कर विभागात दाखल केला. सदर अर्जाच्या अनुशंगाने उक्त मिळकतीवर पत्र जा.क्र./उमपा/करवि/यु.३/३४/२२ दि. १३/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणून श्री रामचंदर **रामबली जैसवार** अशी नोंद करण्यात आली असुन नोंद करतेसमयी खालीलप्रमाणे कागदपत्र जोडले आहेत.

१. महापालिकेकडील विहित नमुन्यातील अर्ज
२. सुरेंद्र रामबली जयस्वार व **श्री रामचंदर रामबली जैसवार** यांचे दरम्यान हक्कसोडपत्र नोटरी नं. ७०६ दि. ०१/०४/२०२२ ची छायांकित प्रत
३. रामबली जोसर यांचे मृत्यु दाखल्याची छायांकित प्रत
४. धुरादेवी रामबली यांचे मृत्यु दाखल्याची छायांकित प्रत
५. प्रतिज्ञापत्र
६. इन्डीमिन्टी बॉन्ड व ताबापावती नोटरी नं. ७०७ दि. ०१/०४/२०२२
७. दि.२/४/२२ बित्तम बातमी वर्तमानपत्र इत्यादी सादर केलेल्या कागदपत्रानुसार नांव हस्तांतरण करण्यात आले.

तद्नंतर दि. २८/१०/२०२२ रोजी श्री. जालंधर रामबली जैस्वार राहणार बॅरेक नं. ७३४ समोर, शास्त्री नगर, हॉस्पीटल एरिया, उल्हासनगर –३ यांचे नांव हस्तांतरणाचे हरकती अर्ज कर विभागात सादर केला असुन सदर अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्र जोडली आहे.

१. रामबली जोसर यांचे मृत्यु दाखल्याची छायांकित प्रत
२. रामबली जगेसर जैस्वार यांचे ज्येष्ठ नागरिक परिचय पत्र
३. राशन कार्ड
४. प्रतिलिपि परिवार रजिस्टर नोंदीचा उतारा दि.२७/८/२०२२ तहसील सगडी,जिल्हा आजमगड
५. जालंधर यांचे आधारकार्ड
६. जालंधर यांचे कुटुंबाचा प्रतिलिपि परिवार रजिस्टर नोंदीचा उतारा दि.१३/९/२०११तहसील सगडी,जिल्हा आजमगड इत्यादी कागदपत्राची छायांकित प्रत सादर केली आहे.

दि.२८/१०/२०२२ रोजी जालंधर रामबली जैस्वार यांचे अर्जात नमुद केले आहे की माझे वडिलांचे नांवे असलेली मालमत्ता माझी सहमती न घेता माझे भावाने **श्री रामचंदर रामबली जैसवार** यांनी नांव हस्तांतरण केले आहे ते रद्द करण्यात यावे. असा अर्ज कर विभागात दाखल केला आहे.

संबंधीत मिळकतीसंबंधी दि. २८/१०/२०२२ रोजी जालंधर रामबली जैस्वार यांनी सादर केलेल्या अर्जानुसार व सोबत दाखल केलेल्या कागदपत्र पाहता व **श्री रामचंदर रामबली जैसवार** यांनी उक्त मालमत्तेचे नांव हस्तांतरण करतेसमयी सादर केलेले कागदपत्रानुसार असे निदर्शनास आले की, जालंधर रामबली जैस्वार यांचे नावाचा उल्लेख हक्कसोडपत्रामध्ये केलेला नाही. आपण नांव हस्तांतरण करतेसमयी महापालिकेची दिशाभुल केल्यामुळे नांव हस्तांतरण रद्द करण्यात येत आहे. व मिळकतीसंबंधी कोर्टातुन वारसनामा सादर करावे. असे सुचित करणे उचित वाटते.

तसेच उक्त मालमत्तेसंबंधी विषयांकित प्रकरणी संबंधित विभागाचे कर निरीक्षक यांनी दिनांक २९/११/२०२२ रोजी संदर्भित मिळकतींची प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली. त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी अहवाल पुढीलप्रमाणे सादर केला आहे.

१. सद्यस्थितीत मिळकतीचा अद्यापही **श्री. रामबली जे. जैस्वाल** यांचेकडे आहे.
२. महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत कोणत्याही व्यक्तीचे नावाची नोंद कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून करण्यात येते याचा मालकी हक्काशी संबंध नाही.

त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता क्र 25BO00443000 (२५/०३७९) करीता मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून करण्यात आलेली श्री रामचंदर रामबली जैसवार हि नोंद रद्द करुन प्रथम कर आकारणीनुसार **रामबली जे. जैस्वाल** हि नोंद पुर्ववत कायम ठेवणे तसेच उक्त मालमत्तेच्या जागेकरीता मालकी **हक्कासंदर्भात संबंधितांनी समक्ष प्राधिकाऱ्याकडे आवाहन करून कोर्टाकडील** वारसनामा(COURT HEIRSHIP) सादर करणेकरीता सुचित करणे योग्य वाटते.

यास्तव विषयांकित प्रकरणी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत आकारणी पात्र मालमत्ता क्र.25BO00443000 (२५/०३७९) करीता मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून करण्यात आलेली श्री रामचंदर रामबली जैसवार हि नोंद रद्द करुन वर्ष २०२२–२३ प्रथम कर आकारणीनुसार रामबली जे. जैस्वाल हि नोंद पुर्ववत करावी.

२. महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत नोंद करणेकरीता जागेच्या मालकी हक्कासंदर्भात संबंधितांनी समक्ष **प्राधिकाऱ्याकडे अर्ज करून कोर्टाकडील** वारसनामा **(COURT HEIRSHIP)** आदेश प्राप्त करून घ्यावेत तद्नंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

कर निर्धारक व संकलक
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,

१) सिस्टम मॅनेजर उमपा यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.

२) श्री. जालंधर रामबली जैस्वार जालन्धर
राहणार बॅरेक नं. ७३४ समोर, शास्त्री नगर, हॉस्पीटल एरिया, उल्हासनगर –३

३) श्री रामचंदर रामबली जैसवार
राहणार बॅरेक नं. ७३४ समोर, शास्त्री नगर, हॉस्पीटल एरिया, उल्हासनगर –३

5950
11.30AM

RHM
13/12/22
जावक लिपिक
उल्हासनगर महानगर पालिका